# सायबर सुरक्षेविषयी मार्गदर्शन



। अकोला ✍ ।

नरसिंग विद्यालय येथे सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमात सायबर क्राईम आणि त्याचे प्रकार, सोशल मीडियाच्या माध्यमातून ऑनलाइन गुन्हे कसे घडतात, इंटरनेट आणि मोबाइलच्या माध्यमातून होणारे फ्रॉड्स याविषयी विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण आणि सविस्तर माहिती व मार्गदर्शन केले. कार्यशाळा शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोला यांच्या सहकार्याने क्विक हिल फाउंडेशन, पुणे आणि महाराष्ट्र सायबर सेल, मुंबई यांच्या सहयोगाने प्राचार्य डॉ. जे. एम. साबू व उपक्रमाचे समन्वयक डॉ. एच. जे. खरात यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यामध्ये सायबर वॉरियर्स सुमित संजय सपकाळ व अनिकेत भुडके यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्राचार्य सचिन धांडे,व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.